
# छोटे आम्ही

किरण दशमुखे



'छोटे आम्ही' या बालकवितासंग्रहाचे पुस्तक श्री किरण दशमुखे यांनी लिहून स्वतःच प्रसिद्ध केले आहे. त्या पुस्तकाचे सर्वाधिकार श्री. किरण दशमुखे यांचेकडे आहेत.

त्यांनी ई साहित्य प्रतिष्ठानला याचे ई पुस्तक विनामूल्य वितरित करण्याची कायदेशीर परवानगी दिली आहे. त्यानुसार आम्ही आमच्या वाचकांना ते पुस्तक विनामूल्य देत असून त्यांनी ते आपल्या ओळखीच्या मुलांत विनामूल्य वितरित करावे ही विनंती करत आहोत.

या परवानगीसाठी आम्ही श्री. किरण दशमुखे यांचे आभारी आहोत.

# छोटे आम्ही...

(बाल कवितासंग्रह)



●किरण दशमुखे●

**छोटे आम्ही**(Chote Aamhi)

**(बाल कवितासंग्रह)**

© **किरण दशमुखे**

**‘स्वप्नशिल्प’,श्रमिक नगर**
**पाठक मैदानाजवळ,नामपूर रोड**
**सटाणा ता.सटाणा जि.नाशिक**
**पिन–४२३३०१**
**मो.९४२०८८९५७५**
Email:kiran.dashmukhe@gmail.com

**प्रथम आवृत्ती:मे २०२०**



**विनामूल्य बालकांसाठी**

## अर्पणपत्रिका

**कोरोनाच्या संकट काळात**
**ज्यांनी माणूसकी जागवली त्या डॉक्टर,**
**नर्स,पोलिस,प्रशासकीय अधिकारी,जवान,**
**व्यापारी,उद्योजक,कामगार,शेतकरी,शिक्षक**
**या सर्वांना...**



करील मनोरंजन जो मुलांचे,

जडेल नाते प्रभूशी तयाचे ।।

सानेगुरूजी

# अनुक्रमणिका


१. छोटे आम्ही
२. परीचं राज्य
३. उसाचे शेत
४. सुट्टीचा दिन
५. शर्यत
६. बाहुली
७. माझे लाड
८. चला मुलांनो !
९. प्राण्यांची शाळा
१०. ताई
११. माझी शाळा
१२. सांगा कोण?
१३. बाळाचे जेवण
१४. बाळ
१५.पाऊस
१६.स्वप्न
१७.सेकण्ड होम
१८.देवाजीच्या मनात
१९.मैत्री
२०.कळीचे फूल जाहले...

# १.छोटे आम्ही

छोटे झालो आम्ही
हेच आमचे चुकले
मोठे राहिलो असतो
तर असे नसे वागले ॥१॥


आम्ही छोटे म्हणून
देतात धपाटा
मोठे राहिलो असतो
तर शाबासकीची थाप ॥२॥

आम्ही छोटे म्हणून
मत नाही घेणार
पण आमचे सरकार
तर परी चालवणार ॥३॥



आम्हांला नको
मोठ्यांचं जग
आमच्या जगाचा
देव रक्षक ॥४॥

छोटे आहोत आम्ही
हेच फार बरे
मोठ्याचं जग
नको बाबा रे ॥५॥



# २.परीचं राज्य

एकदा स्वप्नात
परीताई आली
मला घेऊन उंच
आभाळात गेली ॥१॥


परी ताईचं राज्य
किती तरी छान
ढगांची गादी अन्
फुलांचे रान ॥२॥




परीताईला म्हटलं
मी इथेच राहीन
शाळेची कटकट
संपून जाई ॥३॥


इतक्यात आईने
ओढली चादर
शाळेला जायचं
म्हणे तयारी कर ॥४॥


# ३.उसाचे शेत



एकदा कोल्होबांनी
घेतले उसाचे शेत
रसवंती काढायचा
केला त्यांनी बेत
हत्तीदादाने तोड केली
माकडाने चरक आणले
बैलोबा फिरवू लागले
अस्वलाने साऱ्यांना वाटले
लांडगेदादा गल्ल्यावर बसले
हिशेबात त्यांनी केला घोळ
रसवंतीला लागलं टाळं







# ४. सुट्टीचा दिन



सुट्टीचा दिन हा आला आला
आनंद भारी वाटे मला ॥धृ.॥

नको सकाळी लवकर उठायला
अंघोळ करून शाळेला जायला
दप्तराचे ओझे नको पाठीला
गुरूजींचा मार नको आज खायला
असा मजेचा दिन आला ॥१॥

आज नसते कटकट आईची
लवकर उठ म्हणून हाक मारायची
बाबांना सुट्टी ऑफिसात जायची
आईला डबा आज नको करायला
असा मजेचा दिन आला ॥२॥

नको दप्तर,नको पाटी
विटी दांडू सुळपाटी
दुपारच्या वेळात नदीकाठी
पाण्यात मनसोक्त डुंबायला
असा मजेचा दिन आला ॥३॥

सायंकाळी पतंग खेळायला
निळ्या नभाला उंच भिडवायला
थकता रात्री पडतो अंथरूणाला
शाळेचा दिवस सकाळी आला
असा मजेचा दिन गेला ॥४॥





# ५. शर्यत

आकाशात लागली
ढगांची शर्यत
चांदोमामा
पाहताय गंमत ॥१॥

काळे पांढरे
छोटे मोठे
एवढ्या वेगात
चाललेय कुठे?॥२॥

पळून पळून
दमतील खूप
शेतात जाऊन
पडतील चूप ॥३॥

शेत सारं
होईल जागं
हिरवं स्वप्न
घेऊन उभं ॥४॥

# ६. बाहुली



भावाची बाहुली
आणली घरा
म्हणते माझे
लगीन करा.
बाहुली मोठी देखणी
घारे डोळे मेखणी
पातळ नेसली नटूनी
बाहुलीचे लगीन ठरले ठरले
वऱ्हाडी सारे जमले जमले
वऱ्हाडी मंडळीत कोण कोण?
ऐका ऐका वऱ्हाडी
ताई बनली वरमाई
आक्का तिची सेवा करी
नवरदेव आणला खरा
जाणवघरी उतरवला
सेवक झाल्या कलवऱ्या
भटजीचे काम
कोण म्हणता
दादा आमचा पुढेच होता
अक्षता वाटल्या भरपूर
मंगलाष्टक झाले सुरू
शुभमंगल सावधान


टाळी वाजली
मंगल झाले
वऱ्हाडी सारे परतले
ताईने घेतली
बाहुला बाहुली
सून–मुले ती तिची जाहली.




# ७. माझे लाड



परी दिसते सुंदर जरी
मला आवडते **आईच** खरी .
**बाबा** देतात जरी मार
तरी मला आवडतात फार .
**आजोबांचं** विचारूच नका
माझा पुरवतात तेच हेका .
**आजी** माझी प्रेमळ फार
माझा मार चुकवणार .
**काका** माझे असतील कडक
पण फिरायला मला नेतात तडक .
**मावशी** माझी कधी कधी येते
येतांना मला कपडे आणते .
मामा माझा मोठा राऊ
भेटायला येतांना आणतो खाऊ.
मला आवडतात सगळेच फार
लाड माझे करतात अपार .





# ८. चला मुलांनो!

चला मुलांनो आपण
सारे गोळा होऊ
सारे मिळूनी आपण
गाणीच गाणी गाऊ ।।धृ.।।



धरणी माय आपुली
आपण तिची मुले
स्तुती सुमने उधळू
गाऊ तिचे गाणे ।।१।।

निळ्या नभात पाहू
सूर्य क्षितिजाकडे
पक्षी बोलती गाणी
कंठी त्यांच्या गाऊ ।।२।।

हिरव्या झाडाखाली
चला थोडे जाऊ
गोल रिंगण करूनी
निसर्ग कविता गाऊ ।।३।।

एक दोन तीन चार
रांगेत उभे राहू
सहल संपली आता
घरी चला जाऊ ।।४।।










# ९. प्राण्यांची शाळा


एकदा प्राण्यांची भरली शाळा
प्राणी सारे झाले गोळा.
हत्तीदादाने आणला फळा
अस्वलाने केला काळा.

माकडाने घंटा आणली
जिराफाने उंच टांगली.
ससोबाने आणला खडू
कासव बसले कोपऱ्यात दडू.

गेंड्याने आणले टेबल
हरिणाने लावले लेबल.
उंदीर घेऊन आले डस्टर
कोल्होबा झाले मास्तर.

वर्ग झाला जोरात सुरू
प्राणी लागले अभ्यास करू
इतक्यात आले वाघोबा
सारे पळाले धूम तोबा.





# १०. ताई



असशील ताई तू म्हणून काय झालं?
मी ही दादा आहे लक्षात ठेव म्हटलं.
ताईगिरी आता तुझी फार झाली
दादा म्हणून मला आता मान तरी.
आई–बाबा,आजी–आजोबा
सारेच म्हणतात ताई–ताई
काही काम असलं म्हणजे
दादालाच हाक येई.
पाहुणे–पै आले तरी, सारे ताईलाच विचारतात
दादाला मात्र, त्यांची व्यवस्था ठेव म्हणतात
फिरायला गेलं म्हणजे ताईने मागितलं ते देतात
मी काही मागणार तर,पुन्हा आणणार नाही
म्हणतात
ताईचा खर्च किती,पावडर,लाली,गंध, टिकली
रोज मॅचिंग बदलत जाते,तऱ्हेतऱ्हेच्या बांगड्या
घालते.
माझा तर काही खर्चच नाही,ताईची फार मज्जा
काही
आईला सांगतो असं मी जेव्हा,,तेव्हा ती मला
म्हणते खरी
तुझंच आहे हे सारं,ताई जाईल परक्या घरी.



# ११. माझी शाळा


शाळा माझी शाळा
छान छान शाळा
शाळेचा आम्हांला
लागलाय लळा ।।१।।

बाई आमच्या बाई
छान छान बाई
गाणी गोष्टी आम्हा
शिकवितात काही ।।२।।

मित्र माझे मित्र
छान छान मित्र
खेळायला सारे
जमतो एकत्र ।।३।।

शिकू आम्ही सारे
खूप खूप काही
शाळेच्या आमच्या
नाव मोठे होई ।।४।।





## १२.सांगा कोण?


आभाळातून आल्या
पावसाच्या धारा
सांगा एवढं
रडतंय कोण?।।

आभाळातून येतो
घरघर आवाज
सांगा एवढं
दळतंय कोण?।।

आभाळातून येतो
लखलख प्रकाश
सांगा बॅटरी
लावतोय कोण?।।

आई म्हणते
अरे बाळा
या तर साऱ्या
देवाच्या लिळा.।।






# १३. बाळाचे जेवण

काव काव करीत
नको येऊ रे काऊ
बाळाला मी माझ्या
घालतोय ना जेऊ ॥१॥




जा ग चिऊ भुर्रकन्
येऊ नको आता
बाळाला माझ्या
खायचा ना भाता ॥२॥

जा ग माऊ जा
नको दाखवू मिशा
बाळाच्या दूधावर
डोळा तुझा कसा ॥३॥




थांब ग खारूताई
येऊ नको अशी
बाळ माझं छान
झोपलंय ना खुशी ॥४॥





# १४. बाळ

चिऊताई चिऊताई
ये ग, ये ग, ये ग
माझ्या बाळाला
तू अंगाई गा ग ॥१॥



सुगरण मावशी
तुम्ही या ना
माझ्या बाळाला
काजळ घाला ना ॥२॥


राघू दादा तू ये रे
बाळाला पेरूची
फोड दे रे,गोष्टी
आणीक सांग बरे ॥३॥



मैनेताई तू ये ग
गोड गोड गाणी गा
साऽ रेऽ गऽ मऽ
शिकवून जा ॥४॥

कबुतरा तू ये रे
बाळाचा संदेश घे
मामाच्या गावाला
नेऊन दे ॥५॥









# १५. पाऊस

पावसा पावसा ये रे ये
गार गार गारा दे
गारा वेचत वेचत आम्हा
चिंब चिंब भिजू दे ॥१॥

पावसा पावसा ये रे ये
धरणे,तळी भरू दे
नदीला येईल पूर
शाळा आमची आहे दूर ॥२॥

शाळेला आमच्या मिळेल सुट्टी
पावसाशी मग आमची गट्टी
पाण्यात सोडू कागदाच्या नावा
पोहोचतील त्या मामाच्या गावा ॥३॥

पावसा पावसा ये रे ये
वृक्ष–वेलींना धीर दे
वृक्ष देतील फळे छान
खाऊन आम्ही होऊ जवान ॥४॥





# १६. स्वप्न

झोपेमध्ये रात्री
मी स्वप्नात जातो
स्वप्नामध्ये खूप खूप
मज्जाच मज्जा करतो।।१।।

दिवसा माझा हट्ट
आईने पुरवला नाही
तर नाताळबाबा येऊन
मला सर्व काही देतो ।।२।।



स्वप्नामध्ये मी तर
विमानात बसतो
विमानात बसून
चांदोमामाकडे जातो ।।३।।

मला पहायचा असतो
मामाचा चिरेबंदी वाडा
लिंबोणीचं झाड
अन् चांदण्याचं रान ।।४।।

मध्येच विमानात आमच्या
काही तरी बिघाड होतो
पॅराशूट घेऊन आम्ही
तरंगत खाली उतरतो ।।५।।

जमिनीला पाय टेकताच
आईचा आवाज येतो
लवकर ऊठ म्हणतांनाच
पाठीत धपाटा बसतो ।।६।।



## १७. सेकण्ड होम



प्रणव झाला तीन वर्षाचा
घरात सुरू झालीय चर्चा
त्याला शाळेत पाठवायचा
सर्वांनी काढला एकच मोर्चा ।१॥


आता सकाळी लवकर उठायचं
शाळेचं दप्तर पाठीला लावायचं
टिफिन,वॉटर सोबत घ्यायचं
शाळेत आपल्या हाताने खायचं ॥२॥

स्कूल बस येईल वेळेत घ्यायला
पटापट आपण तयार व्हायचं
आईपासून असं,दूर पहिल्यांदा
शाळेत आपण कसं राह्यचं? ॥३॥

शाळेचं नाव काढताच कसं
प्रणवला असं यायचं रडू
कशी असेल शाळा अन् बाई
मनात लागायचा भलताच कुढू ॥४॥

अखेर तो दिवस उजाडला
रडत भोकाडत शाळेला गेला
शाळा तर होती मोठी सुंदर
विद्यादेवीचे ते तर मंदिर ॥५॥

थोडावेळ रडला मग बागडला
गाणी, गोष्टी धमाल केली
बाईंने दिले चॉकलेट दोन
शाळा झाले 'सेकण्ड होम' ॥६॥



# १८. देवाजीच्या मनात



एकदा देवाजीच्या
सहज मनात आले
स्वर्गातले अन्न खाऊन
फारच कंटाळवाणे झाले.
चला जाऊ पृथ्वीवर
नैवेद्य खाऊन आपण
मनसोक्त परत यावे.
वेळ होती दुपारची ती
वाजले होते बारा
देवाजीच्या भक्तांचा
चालला होता नगारा.
धूप,दीप,नैवेद्याने
होते सर्व सज्ज
पाहून देवाजी
झाले मनी फज्ज.
नैवेद्य केला फस्त
परत जाणार तोच आला
बिलाचा कागद दस्त.
फुकाचे का जेवण हवे
देवा तुला मस्त
जाऊन बघ पंचतारांकीत
मग कळेल तुला
आमचा भाव किती स्वस्त.
ऐकून हे सर्व काही
देव झाले त्रस्त
मनी म्हणाले
उगाच आलो आपण येथे
स्वर्ग सोडून मानवात
यांना हवा देव येथे
फक्त दगडात...

# १९. मैत्री


सांगा सांगा मैत्री करू मी कुणाशी ?
सारेच म्हणतात माझी माझी ।।

बागेमध्ये जातो,फुलपाखरू येते
मला म्हणते,पंखावरती बसवून तुजला
आणीन सारे फिरवून।।१।।





समुद्र किनारी जातो,मासा बाहेर येतो
हळूच मला म्हणतो,पाठीवरती बसवून तुजला
आणीन समुद्र फिरवून ।।२।।



जंगलामध्ये जातो,हत्तीदादा मला झुलवतो
भल्या मोठ्या सोंडेने रे,फळे तुजला देईन
पाठीवरती बसवून ।।३।।

सारे सारे सोडून मी रे,घरीच माझ्या येतो
अंगणात चिमण्यांचा, थवा येऊन बसतो
दाणे टिपून सारे,भुर्र उडून जातो ।।४।।






# २०. कळीचे फूल जाहले...

एक कळी
रूसली
डोळे मिटून
बसली ॥१॥

हलेना की
चालेना
कुणाशीच
बोलेना ॥२॥


वाऱ्याने
हलवले
ताऱ्याने
खुणावले ॥३॥



कळी आपली
गप्प दंग
झाडाच्या कुशीत
लपवून अंग ॥४॥

सूर्याने किरण
आणले
कळीचे मग
फूल जाहले ॥५॥

फूल लागले
डोलायला
मुले लागली
नाचायला ॥६॥





## परिचय


**पूर्ण नावः**श्री.किरण दत्तात्रय दशमुखे

**शिक्षणः**बी.एस्सी.,बी.एड्.,एम.ए.,एम्.फिल.

**पत्रव्यवहाराचा पत्ताः** 'स्वप्नशिल्प',श्रमिक नगर,पाठक मैदानाजवळ,सटाणा जि.नाशिक पिनः४२३३०१

मो.९४२०८८९५७५

**Email:**kiran.dashmukhe@gmail.com


### लेखन कार्यः

१) 'मॉर्निंग वॉक' हे ललित लेखांचे पुस्तक तरंग प्रकाशन,औरंगाबाद यांच्या मार्फत २०१० साली प्रकाशित .(शासकीय ग्रंथालय निवड यादीत समावेश)

२) 'तू राजहंस एक...' व्यक्तिमत्व विकास या विषयावरील पुस्तक २०१० साली प्रकाशित.

३) ' देव मामलेदार यशवंतराव महाराज' यांचे चरित्र लहान मुलांसाठी २०१३ मध्ये प्रसिध्द.

४) 'वर्तुळातील माणसे' हे व्यक्तिचित्रण २०१७ साली साहित्यसेवा,नांदेड यांच्यातर्फे प्रकाशित.

५)'जीवनाचे गणित' हे विद्यार्थी,पालक व शिक्षक यांना प्रेरणादायी पुस्तक महाजन ब्रदर्स पूणे यांचे मार्फत २०१७ साली प्रकाशित.

६)'अपूर्ण कथा' हा कथासंग्रह शांती पब्लिकेशन,पूणे यांचे तर्फे २०१८ साली प्रकाशित. (शासकीय ग्रंथालय निवड यादीत समावेश)

७) 'संघर्ष' या दिवाळी अंकाचे संपादन

८) अध्यक्ष,सुबोध बहुउद्देशिय शिक्षण संस्था

९) मुख्याध्यापक,स्वामी विवेकानंद बालविकास मंदिर,सटाणा(नाशिक)

१०) सदस्य, 'साहित्यायन' संस्था.

११) जवळपास ३५० लेख ,कथा,कविता विविध वर्तमानपत्रे,मासिके यातून प्रसिध्द.

१२) दै.लोकमत व साप्ता.नगारा यातून स्तंभ लेखन.

### पुरस्कारः

१) येवला येथील वृत्तपत्र लेखक संघाचा 'लोकमान्य गौरव' पुरस्कार(२०१०)

२) मराठी साहित्य परिषद,अहमदनगर च्या वतीने 'संस्कृती वैभव' पुरस्कार(२०१२)

३) गिरणा गौरव प्रतिष्ठान,नाशिक यांच्या वतीने 'गुरूवर्य सन्मान' पुरस्कार(२०१५)

४) नाशिक जिल्हा शिवसेना शाखेच्या वतीने भगूर येथे 'गुणवंत साहित्यिक' पुरस्कार(२०१६)

५) देवमामलेदार रोटरी क्लब ऑफ बागलाण च्या वतीने 'आदर्श शिक्षक' पुरस्कार(२०१६)


या कवितांना चाल लावून गाणे बनवा
ते रेकॉर्ड करून किरणकाकांना 9420889575 या क्रमांकावर व्हिडिओ पाठवा
एक सुंदर गिफ़्ट मिळवा